http://amrutmanthan.wordpress.com/

# मराठी शाळांसाठीचा मास्टर प्लॅन सहा महिन्यांत

सकाळ वृत्तसेवा

Tuesday, January 12, 2010 AT 12:00 AM (IST)

Tags: Sakal, Marathi medium schools, State Government, permission, grant, education policy

मुंबई - राज्यातील प्राथमिक व माध्यमिक मराठी शाळांसाठीचा बृहत्‌आराखडा (मास्टर प्लॅन) येत्या सहा महिन्यांत तयार करून प्रसिद्ध केला जाईल, अशी हमी राज्य सरकारने आज उच्च न्यायालयात दिली.

सरकारने हा आराखडा सहा महिन्यांत तयार करून प्रसिद्ध केल्यावर ज्या संस्थांना शाळांसाठी परवानगी हवी असेल, त्यांनी राज्य सरकारकडे अर्ज करावा. त्यांचा अर्ज मिळाल्यापासून चार महिन्यांत सरकार त्यावर निर्णय देईल, असेही आज सरकारी वकिलांनी सांगितले. त्यामुळे आता नव्या मराठी शाळांना दहा महिन्यांत सरकारची परवानगी मिळेल.

गेली अनेक वर्षे हा आराखडा तयार करण्याचे काम रखडले आहे. त्यामुळे अनेक मराठी शाळांना परवानगी मिळत नाही, अशी स्थिती आहे. या आराखड्यानुसार प्रत्येक विभागात किती शाळांची गरज आहे, ते तपासून त्यानुसार नव्या शाळांना संमती देण्यात येते; तर दुसरीकडे सरकारने मागील वर्षी ऑगस्टमध्ये दोन जी. आर. काढून इंग्रजी, कन्नड, उर्दू व हिंदी माध्यमाच्या शाळांना परवानगीही दिली होती. त्या पार्श्वभूमीवर आजचा हा निर्णय महत्त्वाचा आहे.

या विषयावर राज्यातील विविध मराठी शाळाचालकांनी ऍड. अशोक जोशी, ऍड. दिलीप बोडके आदींमार्फत सादर केलेल्या याचिकांची सुनावणी आज न्या. डी. के. देशमुख व न्या. ए. आर. जोशी यांच्यासमोर झाली. त्या वेळी शालेय शिक्षण खात्याचे सहसचिव ए. एम. भट्‌टलवार यांचे प्रतिज्ञापत्र सरकारी वकिलांनी खंडपीठासमोर सादर केले. त्यात वरील हमी देण्यात आली आहे.

सातारा जिल्ह्यातील शिरवळ गावच्या (ता. खंडाळा) श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ व प्रगती विद्यामंदिर यांच्या या याचिका होत्या. त्यांनी अनुक्रमे माध्यमिक व प्राथमिक शाळेसाठी मे 2008 मध्ये परवानगी मागितली होती. जिल्हा व राज्य समितीने त्यास मंजुरी दिली; मात्र नंतर जुलै 2009 मध्ये शालेय शिक्षण विभागाने मराठी शाळांचे अद्याप मान्यता न मिळालेले सर्व प्रस्ताव रद्द केले. बृहत्‌आराखडा केल्यावरच मंत्रिमंडळ उपसमिती त्याबाबत निर्णय घेईल, असे त्या "जीआर'मध्ये म्हटले होते. "जीआर'ला याचिकेत आव्हान देण्यात आले होते.